ललिता गंडभीर
Lalita Gandbhir
4200 North Ocean Drive.
1501-2
Riviera Beach, FL. 33504.
U. S. A.

# व्दंव्दयुद्ध

ज्योतीचा जन्म झाला तेव्हा सर्वांनाच आनंद झाला. पण राधाबाईना तर हर्षवायूच झाला. ज्योती ही राधाबाईच्या तिसऱ्या सुनेची,मनोरमेची मुलगी. मनोरमा घरातली सर्वात धाकटी सून! दुसऱ्या दोन्ही सुना बऱ्याच मोठ्या होत्या. त्यांना व मनोरमेला मिळून सात मुलगेच होते. राधाबाईंची एक तान्ही मुलगी आजारी पडून वारली होती. तेव्हापासून त्यांना आपल्या घरात एक मुलगी हवी अशी फार इच्छा होती. पण तिच्या मृत्यूनंतर त्यांना दोन मुलगे झाले. नंतर निदान नात तरी होईल,अशी त्या मनात आशा धरून होत्या.

मनोरमेच्या दुसऱ्या मुलाच्या जन्मानंतर 'देव आपली इच्छा कधीच पुरी करणार नाही' असं त्यांनी स्वतःला सांगितलं होतं. तरी पण त्या नवस बोलतच राहिल्या होत्या. आणि आज त्यांची इच्छा पुरी झाली होती. शिवाय ज्योती दिसायला नक्षत्रासारखी सुंदर होती. त्यामुळे राधाबाईच्या आनंदात भरच पडली होती.

ज्योतीच्या घराण्याच्या गावात वडिलोपार्जित जमिनी होत्या. त्याशिवाय ज्योतीच्या वडिलांनी काढलेल्या हातमागाच्या धंद्याची ज्योतीच्या जन्माच्या वेळेपर्यंत खूप भरभराट झाली होती आणि घरावर लक्ष्मी प्रसन्न होती. एकूण ज्योतीचा जन्म हा राधाबाईच्या सुखी आयुष्यावर चढलेला कळस होता. त्यांनी ज्योतीचे बारसे लग्नासारखे जेवण घालून थाटात केले. दुसऱ्या दिवशी मोठी सत्यनारायणाची पूजा केली नंतर मुलगी व्हावी म्हणून केलेले नवस फेडायलाच त्यांना सबंध वर्ष लागले.

ज्योती पांच वर्षाची झाल्यावर एकदा आजी व आईबरोबर देवळात गेली होती. त्या दिवशी देवळाभोवती जत्रा भरली होती. एका बाजूला तात्पुरती रंगभूमी उभारून नाच चालला होता. रंगीत कपडे आणि दागिने व पायात घुंगरू घालून चार मुली ढोलकं व पेटीच्या तालावर नाचत होत्या. आजी व आई थोडा वेळ नाच पहात थांबल्या,मग देवळात जायला निघाल्या. देवळात पोहोचल्यावर त्यांच्या लक्षात आलं की ज्योती आपल्याबरोबर नाही. प्रत्येकीला तिने दुसरीचा हात धरला असे वाटले होते. दोघीही फार घाबरल्या.

एरवी त्यांच्या गावात तसा धोका नव्हता पण आज जत्रेमुळे बाहेरची खूप माणसे गावात आलेली होती. घाईघाईने त्या देवळाबाहेर गेल्या आणि ज्योतीला शोधू लागल्या. त्यांना फार शोधावे लागले नाही. एका ओळखीच्या माणसाने रंगभूमीकडे बोट दाखविले. मनोरमेला आणि राधाबाईना रंगभूमीकडे बघताच धक्का बसला. ज्योती त्या मुलीबरोबर नाचत होती.

गावातली माणसं ज्योतीच्या त्या मुलींची नक्कल करून नाचण्याच्या प्रयत्नाला कौतुकानं हसत होती. मनोरमा व राधाबाई जागीच खिळून उभ्या राहिल्या. अत्यंत जुन्या वळणाच्या आपल्या सासूबाई आता काय म्हणणार ह्याची काळजी मनोरमेला लागली. 'राधाबाईच्या मनात,ज्योतीला कुणी पळवली का?' हा अभद्र विचार घोळत होता. त्यांना ज्योतीला सुखरूप पाहून अत्यानंद झाला. रागवणं वगैरे त्याक्षणी तरी त्यांना शक्य नव्हतं. नाच संपला. टाळ्यांच्या कडकडाटाने ज्योती भानावर आली. जवळ आपली आई किंवा आजी नाही हे तिला जाणवलं आणि ती रडवेला चेहेरा करून आसपास बघू लागली. राधाबाईनी मग तिला रंगभूमीवर जाऊन खाली आणली.

'लहान आहे अजून ज्योती! नाचणं घरंदाज मुलीसाठी नव्हे हे तिला अजून समजत नाही.' असं त्यांनी मनोरमेला म्हटलं. तरीसुद्‍धा मनोरमेने ज्योतीला नाचण्याविरुद्‍ध एक प्रवचन ऐकवलं. ज्योतीने प्रवचन ऐकून गाल फुगवले.

'तू काही म्हटलंस तरी मला नाच आवडतोच' असं म्हणत पुढचा महिनाभर ती पैंजण घालून त्या नाचणाऱ्या मुलींची हातवारे करून नक्कल करत राहिली.

आणखी सहा महिन्यांनी ती राधाबाई बरोबर कुणाच्या तरी घरी गेली होती. तिथून परतताना तिला घुंगुरूचा आवाज आला. त्या आवाजाच्या दिशेने ती सुसाट पळत सुटली. राधाबाईना तिच्या मागे जाणं भाग पडलं. ज्योती एका उघड्या दरवाजातून आत गेली. राधाबाई मागोमाग गेल्या. दरवाजाबाहेर 'रत्नप्रभा नृत्यकला केंद्र' अशी पाटी होती. आत एक तरुण स्त्री चारपांच मुलीना तबल्याच्या ठेक्यावर नाच शिकवत होती. मुलींनी घुंगरू बाधले होते. ज्योती मंत्रमुग्ध झाल्यासारखी बघत उभी राहिली होती. राधाबाई दरवाजात येताच शिकवणाऱ्या बाईने नाच थांबवला,व त्यांना बसायला अदबीने खुर्ची दिली. आणि पुन्हा क्लास सुरु झाला. राधाबाईना खर तर ज्योतीला तिथून खेचत न्यायचं होतं. पण ज्योती जबरदस्त भोकांड पसरेल याची त्यांना खात्री होती. उगाच तमाशा नको म्हणून त्या जरा टेकल्या. अर्ध्या तासाने क्लास संपला. मग त्या बाईने ज्योतीच्या पायात घुंगरू बांधले. तिला थोडे पाय मारायला शिकवले. शेवटी राधाबाई जायलाच उठल्यावर तिने स्वतःची ओळख करून दिली. 'माझं नाव रत्नप्रभा. आम्ही या गावात हल्लींच राहायला आलो. माझे यजमान शाळेत शिकवतात. मी नाचाचे क्लास चालवते. तुमच्या मुलीला नाचाची खरी आवड आहे, असं दिसतय. तुमची इच्छा असल्यास जरूर तिला पाठवा नाच शिकायला!' राधाबाई काहीच म्हणाल्या नाहीत; पण ज्योतीने टाळ्या वाजवून 'हो, हो!' 'मी येणारच!' म्हणून रत्नप्रभाला सांगितलं.

राधाबाई घरी जाताना एकही शब्द बोलल्या नाहीत. घरी पोहोचल्यावर 'मी नाच शिकणार' म्हणून ज्योतीने सर्वाना सांगितलं. त्या दिवसापासून तिने नाच शिकण्याचा हट्‍ट केला. राधाबाईच्या व मनोरमेच्या विरोधाला न जुमानता तिचा हट्‍ट व रडणे इत्यादी सुरु राहिलं.

ज्योतीचे वडील व काका यांचा खरं तर ज्योतीला नाचाच्या क्लासला घ्यालायला विरोध नव्हता. परंतु ज्योतीच्या हट्टाखातर आपल्या आईच्या इच्छेविरुद्ध शब्द उच्चारायची त्यांना हिंमत नव्हती. ज्योतीच्या चुलतभावाना मात्र आजीचा एवढा धाक नव्हता. बऱ्याच दिवसाचं ज्योतीचे रडणे आणि हट्ट ऐकून सर्वात मोठा चुलतभाऊ मोहन वैतागला.

'जाऊ दे न तिला नाच शिकायला. आजी,तुझ्या कल्पना अगदी जुनाट आहेत. पुण्या मुंबईसारख्या गावात आता चांगल्या घराण्यातील मुली नृत्य शिकतात. तमाशातल्या स्त्रियाच फक्त शिकत नाहीत काही नाच. पाहिजे तर तिच्याबरोबर कुणी जाऊन बसेल तिथे! पाच वर्षाची मुलगी नाच शिकून बिघडेल कशी?

'चांगल्या घराण्यातील मुलगी नाच शिकलीय असं समजलं तर तिचं लग्न चांगल्या घराण्यात व्हायला त्रास होईल' आजीने आपल्या विरोधाचं खरं कारण सांगितलं.

'चुकीची समजूत आहे तुझी!' मोहन ठासून म्हणाला.

'लोकांच्या कल्पना बदलल्यात आता! ज्योती मोठी होईपर्यंत नाच येणं हे एक इंग्लिश येण्यासारखच,लग्नाला फायद्याच सुद्धा होईल' मग तो हंसून म्हणाला, 'माझ लग्न करायचं म्हणतेस ना? नाचणारीच सून शोध आता! मला नाच येणारीच बायको हवी!'

'चावटपणा बंद कर' आजीने मोहनला खोटा दम भरला.

तेव्हा आजी काही म्हणाली नाही तरी दुसऱ्या दिवशी ती व मनोरमा ज्योतीला रत्नप्रभाकडे घेऊन गेल्या रत्नप्रभाने आजीच्या मनातल्या शंका ओळखल्या होत्या.

रत्नप्रभा म्हणाली,"फार पूर्वी नृत्यकला ही पवित्र मानायचे! देवळावर कोरीव कामात भरतनाट्यम् करणाऱ्या आकृत्या आहेत. नृत्यकला हा एक वेद आहे. या कलेचा देव शंकर किंवा नटराज आहे" असे तिने आजीला सांगितले.

ज्योती भराभर भरतनाट्यम् व कथ्यक शिकली. शाळेत दरवर्षी होणाऱ्या वार्षिक समारंभात तिने भागही घेतला. तिला उत्तम नाच येतो असं सर्वांचं मत झालं. तिच्या आजीनं तिला शाळा सोडून इतर कुठेही नाच करू दिला नाही व ती चौदा वर्षाची झाल्यावर तिचं नाचणं बंद करून टाकलं.

'आपण या समाजात राहतोय.' ती ज्योतीला म्हणाली, 'नृत्यकला हा वेद आहे. नृत्य समाजाला ऐके काळी मान्य होतं,हे मला कबूल आहे. पण आपल्या तोलामोलाच्या घराण्याला या काळात सुद्धा आपली सून नाचते हे पसंत पडणं अशक्य आहे. नवऱ्या मुलाला चालेल कदाचित; पण सासू-सासऱ्यांना नाही चालणार!'

आता ज्योतीला रडणं,हट्ट करणं शक्य नव्हतं. तिचा नाच बंद झाला पण तिच्या हृदयाला कुठेतरी खोल जखम झाली.

पुढे सरकणाऱ्या काळाबरोबर त्या जखमेवर खपली धरली. पण ती जखम पूर्णपणे कधीच भरली नाही. ज्योतीला आपल्या आयुष्यात मोठी पोकळी निर्माण झाली आहे असं वाटत राहिलं.

शाळा संपल्यावर दोन वर्षे ज्योती कॉलेजात गेली. तोलामोलाचं घराणं पाहून ज्योतीचं लग्न झालं. ज्योतीचा नवरा राघव इंजिनियर होता. ज्योतीसारखीच त्याच्याही कुटुंबाची मोठी शेती होती. सुरवातीला एक वर्ष ज्योती सासरी राहिली. वर्षानंतर तिच्या नवऱ्याने मुंबईला नोकरी धरली. ज्योतीची सासू सुरवातीला तिच्याबरोबर मुंबईला आली आणि ज्योती राघवचा संसार थाटून परत गेली.

ज्योतीने आपली नृत्यकला एव्हाना मनाच्या खोल कप्प्यात गाडून टाकली होती. लग्न ठरताना आजीने आणि मनोरमेने, “ज्योतीच्या नाचाविषयी काही बोलू नका हं.” अशी सक्त ताकीद सर्वांना दिली होती. त्यामुळे ज्योतीला ‘आपण नृत्यकला शिकलो’ हा गुन्हाच झाला असं वाटू लागलं होतं. परंतु मुंबईला ती एकटी होती आणि वेळही होता,त्यामुळे तिची नृत्यकला पुन्हा डोकं वर काढू लागली आणि राघव नोकरीला गेला असताना टेप किंवा रेकॉर्डस लावून ती नाच करू लागली.

एकदा दुपारी अशीच ती नाचण्यात गुंतलेली असताना बाहेरचं दार लावायला विसरली. राघव अनपेक्षितपणे घरी आला. टेप ऐकून व ज्योतीला नाचताना पाहून तो जागच्याजागी खिळून उभा राहिला.

चार-पाच मिनिटांनी ज्योती भानावर आली. आणि तिला आपल्याकडे बघत उभा असलेला राघव दिसला. ज्योती एकदम कावरीबावरी झाली.

‘तू असा नाच करायला कधी शिकलीस?’ राघवने तिला विचारलं

‘चुकलं,चुकलं.’ पुन्हा करणार नाही. घरी कुणाला सांगू नका. ‘ज्योती घाबरून म्हणाली.

‘एवढं घाबरायला काय झालं? नाच येतो तर त्यात कमीपणा कसला?
लपवायचं काय कारण?’ राघव हंसून म्हणाला.

‘सासूबाई रागावतील.’ ज्योती म्हणाली.

‘माझ्या माहेरच्यांनी तुम्हाला फसवलं असं त्यांना वाटेल’

‘अशी फसवणूक आपल्याला कधीही चालेल. आणि हे बघ तुझ्या सासूबाईना काही वाटणार नाही आणि वाटलं तरी हरकत नाही. तुझ्या नवऱ्याला पसंत आहे ना?’ असं राघवनं विचारून खुर्चीवर बैठक मारली आणि म्हणाला,

‘आता पुन्हा ती टेप लावून एक परफॉर्मन्स दे बघू!’

पण ज्योतीला ते जमेना ती अजूनही थरथरत होती.

ज्योतीला राघवने खूप समजावल्यावर ती जरा शांत झाली. दोन तीन दिवसांनी राघवने तिला सांगितलं, ‘हे बघ तुझा वेळ जात नाही असं वाटतंय ना? मी जवळच एक नाचाचा क्लास शोधलाय. तू तिथे जायला सुरवात कर.’

पुढच्या दोन वर्षात ज्योती भराभर पुन्हा नाच शिकली. क्लासबरोबर तिचे चारपाच ठिकाणी शो होते. त्यात भागही घेतला.

अकस्मात राघवने काही वर्षासाठी अमेरिकेत नोकरी करायची असं ठरवलं आणि तो व ज्योती मुंबईचं बिऱ्हाड आवरून अमेरिकेला आले. अमेरिकेत बस्तान बसल्यावर ज्योतीने

आपल्या नृत्याच्या ज्ञानाचा उपयोग करता येतो का? हे पाहायला सुरवात केली. तिला गावात एक 'डान्स कॅलेक्टिव' (Dance Collective) म्हणून डान्स क्लास सापडला. ती त्याच्या मालकाला जाऊन भेटली. मालकाने सबंध बिल्डींग नृत्यकलेच्या शिक्षणाला वाहिली होती. तो नृत्य शिकवणाऱ्या शिक्षकांना माफक किंमतीत खोल्या भाड्याने देत असे व शिक्षक स्वतःचे क्लासेस चालवीत. तिथे पाश्चात्य पद्धतीचे बॅले,टॅप,मॉडर्न जाझ,अरेबिक फोक, बेली इत्यादी अनेक प्रकारचे डान्स शिकवणारी माणसं होती. पण भारतीय नृत्य शिकवणारे मात्र कुणी नव्हतं. मालक ज्योतीला भारतीय नृत्य शिकवायची इच्छा आहे हे ऐकून खूष झाला. त्याने तिला 'डान्स कलेक्टिव' मधे येऊन भारतीय नृत्य शिकवायचं आमंत्रण दिलं.

पण ते आमंत्रण स्वीकारायचं कां,ह्याविषयी ज्योतीचा निश्चय होईना. तिने काही डान्स क्लासेस पहिले होते. तिथे अगदी घट्ट पारदर्शक कपडे (बॉडी सूट) घालून नाचणाऱ्या मुलींना पाहून तिला धक्का बसला होता. नंतर तिला त्यातल्याच काही नर्तिका एका विशिष्ट डान्स शो मध्ये कपडे न घालता नाचतात हेही समजलं होतं. डान्सची आवड असतानाही तिला हे खटकलं होतं. अमेरिकेला आल्यावर तिने बिकिनी घातलेल्या मुली पाहिल्या होत्या, टेलिव्हिजनवर अगदी जेमतेम कपडे घातलेल्या स्त्रियाही पाहिल्यावर ती अस्वस्थ झाली. भारतातील देवळात, लेण्यात कोरलेल्या स्त्रियांच्या अंगावर जवळ जवळ कपडे नसतातच तरी पण आपण 'शिल्पकलेचा अविष्कार' म्हणून ते कोरीव काम मनात किल्मिश न आणता स्वीकारतो मग खऱ्याखुऱ्या रक्तामासाचे अनावृत्त शरीर हे कलेचा अविष्कार असे आपण का मानत नाही? त्याला पाप का समजायचं? अशा नर्तिकीना कमी प्रतीच्या मानायचं का? अशा नर्तकी असणाऱ्या संस्थेत आपण काम केलं तर सासूबाईना आणि आईला काय वाटेल? ज्योतीच्या मनाचा गोंधळ उडाला.

हे प्रश्न तिने राघवला विचारताच तो हंसला,'त्यांच्या नीत्तीमत्तेशी तुला काय कराचयं? प्रत्येक समाजात नीती अनीतीच्या कल्पना वेगळ्या असतात. कट्टर मुसलमान 'तू आपलं तोंड पुरुषाला दाखवतेस' हे सुद्धा अनैतिक मानतील,स्टेजवर नाच करणं हे तर कुलीन स्त्रियांच्या अब्रूला काळिमा आणणारच त्यांच्या दृष्टीने! फार कशाला,तुझ्या आईलाही ते पसंत नाहीच. या समाजात नीती अनीतीच्या सामाजिक बंधनाचे नियम अगदी अस्पष्ट आहेत. जो तो स्वतःला योग्य वाटेल ते करतो. तू त्यांना भारतीय मापाने मोजू नकोस. त्याचं त्यांना ठीक आहे,तुझं तुला! त्यांचं वागणं काही संसर्गजन्य नाही. तुझी नृत्यकला तुला टिकवायला हा एकच मार्ग आहे,या देशात खुशाल तू नाच शिकवायला सुरवात कर.' ज्योतीला असं राघवकडून उत्तेजन मिळाल्यावर तिने नाच शिकवायला सुरवात केली.

ज्योतीने क्लासेसची जाहिरात देताच सुरवातीला काही भारतीय व काही अमेरिकन मुली तिच्याकडे नृत्य शिकण्यास येऊ लागल्या. ज्योतीला 'आपल्या आयुष्यात अमेरिकेत आल्यावर नाच सोडून दिल्यामुळे मोठी पोकळी निर्माण होणार आहे ही वाटणारी काळजी दूर झाली.'

डान्स कलेक्टिवात तिला कॅथरिन भेटली. 'तुझ्यासारखी लयदार आणि डौलाने चालणारी स्त्री मी प्रथमच पहिली!' ज्योतीला प्रथम पाहिल्यावर कॅथरिन उद्गारली.

‘तुझ्या इतकी सडसडीत,नाजूक,रेखीव बाई मीही आजवर पहिली नव्हती.’ ज्योतीने उत्तर दिलं.

‘तुझ्यासारखी सुंदर,नाजूक बाई जगात असेल यावर माझा विश्वासच नव्हता’ कॅथरीन हसून म्हणाली. आपल्या मोठ्या बदामी,काळ्या,डोळ्यावरच्या दाट पापण्या उडवत ज्योती उत्तरली. ‘आरशात बघ. दिसेल तुला.’

ज्योती जुन्या लेण्यातल्या मूर्तीसारखी कोरीव व कमनीय होती, तर उंच रेखीव नाकाडोळ्यांची कॅथरिन अप्सरेसारखी मादक आणि मोहक होती. दोघीही आपापल्या परीने सुंदर होत्या. आणि दोघीनाही नृत्यकलेची अपार आवड होती. ही त्यांची आवड साधीसुधी नव्हती. दोघींच्याही बाबतीत ते एक प्रकारचं वेड किंवा अगाध भक्तीच होती,त्यांच्या स्वतःच्या जीवनापासून नृत्यकला वेगळी करणं त्यांना अशक्य होतं. ती दोघींच्याही रक्तातूनच वाहात होती. आणि हे त्या दोघींनी जरी बोलून दाखवलं नव्हतं तरी ओळखलं होतं. एका कलाकाराच्या हृदयाला दुसऱ्या कलाकाराचं हृदय ओळखता येतं.

कॅथरिन कडून ज्योतीने पाश्चात्य नृत्याचे काही धडे घेतले. अनादी अनंत काळात तालाबोलाच्या चौकटीत बसवलेल्या भारतीय नृत्याची ज्योतीला सवय होती. तिला हे पाश्चात्य पद्धतीचं स्वैर,कधी उत्स्फूर्तपणे केलेलं तर कधी तालाच्या चौकटीत बसवलेलं नृत्य हा नवा अनुभव होता. कॅथरिनला हात,पाय,डोळे,शरीर हावभाव ह्यांची संपूर्ण सुसंगत गाठ घालणारं भारतीय नृत्य अपूर्व वाटलं,कुठल्याही प्रकारच्या नृत्याची दोघींनाही आवड होती. त्यातलं कौशल्य समजून घ्यायची त्यांची पात्रता होती त्यामुळे त्यांची घनदाट मैत्री झाली.

कॅथरिन मधून मधून डान्स शोमध्ये भाग घेत असे. अशाच एकदोन शोला तिने ज्योतीला आग्रहाचं निमंत्रण दिलं. ज्योती व राघव शो पाहून आले. एका शोमध्ये कॅथरिनने जवळजवळ अनावृत्त नृत्य केलं. घरी आल्यावर ज्योतीच्या लक्षांत आलं की ते नृत्य आपल्याला थोडं सुद्धा खटकलं नाही. ‘आपण किती बदललो’ ह्याचं तिचं तिलाच आश्चर्य वाटलं.

हळूहळू ज्योतीला कळलं की कॅथरिन नुसते डान्स शिकवण्यात आणि मधून मधून शो करण्यात संतुष्ट नाही. तिला एकटीला नृत्य कोरिओग्राफ करायचे होते. विविध वाद्यांना सुसंगतपणे जुळवून स्वतः नृत्यनिर्मिती करायची होती. दुसऱ्यानी शिकवलेले धडे घेऊन शो करण्यात व नाच शिकवण्यात तिला आता रस उरला नव्हता.

पण त्या गावात ते शक्य नव्हतं. नृत्य निर्मितीला प्रवीण वाद्यवादक लागतात, ते त्या गावात फार कमी होते. शिवाय नृत्यनिपुण कलाकारही थोडे होते. त्यांना जमवून शो निर्माण केला तरी रंगभूमीवर तो करणे कॅथरिनसारख्या नवशिक्या नर्तकीला कठीण होतं. रंगभूमीवर असे शो आणायला पैसे तिच्याकडे नव्हते. शिवाय गावात फारच थोडे शो निर्माण होत असल्याने बहुतेक सर्व न्यूयॉर्कसारख्या मोठ्या शहरी बसवल्यावर व प्रयोग झाल्यावर गावांत आणले जात असत. थोडक्यात त्या लहानशा गावात कॅथरिनला तिची महत्वाकांक्षा पूर्ण करायला मार्ग नव्हता. तिला न्यूयॉर्कला जाऊन राहाण्याची आवश्यकता होती. पण तेही कठीण

होतं. या गावात डान्सच्या शिकवण्यातून व शोमधून होणाऱ्या उत्पन्नातून कॅथरिनची जेमतेम गुजराण होत होती. न्यूयॉर्कला राहाण्याचा खर्च दुप्पट झाला असता आणि तिथे बस्तान बसवून पैसे मिळवायला वेळही लागला असता. तोपर्यंत गुजराण करणं कॅथरिनला कठीण होतं.

न्यूयॉर्कला कुठे नोकरी करून पैशाची व्यवस्था करणंही कठीण होतं. कारण अगदी वरच्या थराला पोहोचायचं तर आयुष्याचा प्रत्येक क्षण नृत्यकलेच्या सेवेला वाहायची जरुरी होती.

ज्योतीला कॅथरिनची तडफड समजत होती. मनुष्याच्या अंगातल्या कलेला जर वाव मिळाला नाही तर होणारे मानसिक क्लेश ज्योतीला परिचित होते. आजीने चौद्याव्या वर्षी नाच थांबवला तेव्हा गाळलेल्या अश्रूंची आठवण तिच्या मनात अजूनही ताजी होती.

एक दिवस कॅथरिन धावत ज्योतीचा क्लास संपल्यावर ज्योतीला भेटायला आली. ‘ज्योती,मी न्यूयॉर्कला जायचं ठरवलं आहे,’ तिने गंभीर चेहेऱ्याने ज्योतीला सांगितलं.

‘अभिनंदन!’ ज्योती उद्गारली. ‘मग तू असं वाकडं तोंड कशाला करतेस? आणि पैसे कुठून मिळाले तुला? तुझ्या आईने द्यायचे ठरवले का?’

‘माझी आई जन्मात ह्या नाचासाठी पैसे देणं शक्य नाही. मला एका मुलीने पैसे मिळवण्याचा सोपा पण थोडा अनैतिक मार्ग सुचवला आहे.’

‘काय!’ ज्योती थरथरली. ‘म्हणजे?’

‘म्हणजे मी न्यूयॉर्कला गेले की ती मला एक कॉल गर्ल्सच्या नावाची यादी ठेवणाऱ्या बाईकडे नेणार आहे. ती बाई अगदी उत्तम व श्रीमंत गिऱ्हाईक पाठवते. महिन्यातून दोनदा जरी मी हे काम केलं तर मला पैशाची ददात पडणार नाही. मला हा मार्ग पसंत नाही पण सध्या ही एकच वाट मला खुली आहे. माझ्या कलेसाठी मला हा त्याग करायला हवा. नाहीतर माझा जन्म ह्या गावातच जायचा!’ कॅथरिन न थांबता आवेगाने बोलत होती. एकदम तिच्या लक्षात ज्योती थरथरते आहे हे आलं.

‘ज्योती, तुला हे मुळीच पसंत नाही ना? चुकतंय का माझं,सांग.’ ज्योतीच्या पोटात आता ढवळत होतं.

‘कॉल गर्ल्स! वरच्या दर्जाच्या वेश्या?’ ज्योतीच्या तोंडातून शब्द फुटेना. कॅथरिनला उत्तर न देता तिने आपली पर्स उचलली आणि ती कॅथरिनच्या विनवण्या न ऐकता घरी निघून आली.

वाटेत ज्योतीच्या मनात वादळ उठलं होतं. कलेसाठी कशाची किंमत द्यायची? ही कला एवढी महत्वाची आहे का? कॅथरिनच्या इच्छा पूर्ण झाल्या नाहीत तर एवढं काय बिघडणार आहे?

कॅथरिनच्या शीलाचे काय? तशी कॅथरिन अगदी साधी होती. तिला छानछोकीची, चैनीची,दागिन्यांची मुळीच आवड नव्हती. आयुष्यात एकच ध्येय तिने ठेवलं होतं. त्यासाठी सर्वस्व अर्पण करायची तिची तयारी होती. तिची आपल्या कलेवरची भक्ती ज्योती समजू

शकत होती. पण त्या भक्तीसाठी किंबहुना त्या कलेच्या उतुंग शिखरावर पोहोचण्यासाठी स्वतःच्या शरीराचा असा बळी देणं योग्य आहे का?

दोन दिवस ज्योती कॅथरिनला टाळत उत्तर शोधत राहिली. राघवला विचारायचे धैर्य तिला झाले नाही.

तिसऱ्या दिवशी दुपारी ज्योतीच्या घरापुढे टॅक्सी थांबली. ज्योतीने दरवाजा उघडला. दारात कॅथरिन उभी होती.

'ज्योती,मी चालले. तुला माझा मार्ग पटत नाही हे मला कळतंय. पण म्हणून तू माझं नाव टाकू नकोस. हा माझा पत्ता. मधून मधून फोन करीन तुला! संबंध ठेवावासा वाटल्यास तू बोल माझ्याशी. 'कॅथरीनच्या डोळ्यांत पाणी उभं राहिलं. 'तू संबंध कायमचा तोडायचा ठरवलास तरी मी तुझ्यावर रागावणार नाही. मी जाते आता!' कॅथरिन दाराकडे वळली.

ज्योतीच्या डोळ्यातही पाणी आलं आणि तिच्या हृद्‌यातला कलाकार तिला विचारू लागला.

'कॅथरिनचा मार्ग तुझ्या दृष्टीने कदापीही योग्य ठरणार नाही. पण कलेसाठी इरेला पेटून,स्वतःच्या इच्छेविरुद्‌ध सर्वस्वाची होळी करणाऱ्या कॅथरिनची तडफड तुला ओळखतां येऊ नये? निदान जाताना तिच्याशी दोन शब्द बोलण्याची तरी माणुसकी दाखव.'

ज्योती दोन पावलं पुढे सरली.

'कॅथरिन,बेस्ट विशेस्' अडखळत ती कॅथरिनला म्हणाली, कॅथरिनच्या चेहेऱ्यावर आनंद झळकला.

'माझं समाधान झालं आता. थँक यू ज्योती,तू एवढं बोललीस हेच पुष्कळ झालं.' असं म्हणत कॅथरिन निघून गेली.

ज्योती धपकन खुर्चीवर बसली. तिच्या मनात विचारांचे काहूर उठले होते. तिच्यातल्या कलाकाराचे तिच्यावरच्या संस्काराशी,तिच्या नीतीअनितीच्या कल्पनांशी व्द्वंव्दयुद्‌ध चालल होतं.

पूर्व प्रसिद्‌धी : पश्चिमगंध, नीहारा प्रकाशन, ऑक्टोबर ८९.
दीपलक्ष्मी, मे ८७.